Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.69
ISSN No. 2456-1665

# भारतीय महिलांचा कौटुंबिक हिंसाचार व आर्थिक समस्या

**शरद भिमराव गाडेकर**
संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
छत्रपती संभाजीनगर

## प्रस्तावना

स्त्रियांच्या होणाऱ्या कौटुंबिक झळास प्रतिबंध करण्यासाठी केंद्र शासनाने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, 2005 व नियम 2006 संपूर्ण भारतात 26 ऑक्टोबर 2006 पासून लागू केला.कायद्याची माहिती नसेल तर त्याचा पीडित महिला लाभ घेऊ शकत नाही. कौटुंबिक हिंसाचार कशास म्हणावे हे सर्व सामान्यांना समजावे एवढ्यासाठीच हा अल्पसा प्रपंच.

वास्तविक स्त्रीच्या परिवारासोबत व साथीदारासोबत एकाच छताखाली राहत असेल आणि तिचा छळ त्या पुरुषाकडून होत असेल तर ती कौटुंबिक हिंसाचार कायद्यान्वये न्यायदंडाधिकाऱ्याकडे संरक्षण मागू शकते. थोडक्यात पीडित महिला व तिच्या मुलांना निवासाच्या अधिकारासह तिच्या सुरक्षितेचा, आर्थिक संरक्षणाचा आदेश न्याय दंडाधिकारी देऊ शकतात. छळापासून संरक्षण मग ते शारीरिक, आर्थिक,लैंगिक तोंडी किंवा भावनिक अत्याचार असोत महिलांना त्याविरुद्ध न्याय मागता येतो.

**पार्श्वभूमी**; कौटुंबिक हिंसेची समस्या किती गंभीर,गुंतागुंतीची आहे, पुरुषप्रधान आणि पितृसत्ताक समाज रचनेतील सत्तासंबंध, त्यामुळे लिंग भावाधिष्ठित होणारी स्त्रियांवरील कुटुंबांतर्गत शारीरिक,मानसिक, आर्थिक,हिंसा स्त्री-पुरुषांमध्ये भेदभाव निर्माण करणारी अशी आहे. स्त्रीच्या मानवी हक्कांचे, राज्यघटनेने दिलेल्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन करणारी अशी आहे हे संवेदनशील दृष्टिकोनातून पाहणे फार महत्त्वाचे आहे. घरचा उंबरठा ओलांडून हिंसा पीडीत स्त्री आपली व्यथा मांडण्यासाठी त्रयस्थ अशा न्याय संस्थेपर्यंत पोहचते तेव्हा ती कोण कोणत्या संकटांना सामोरी गेली आहे, ह्याची सहानुभूती तिच्या प्रश्नाकडे पाहून समजून घेणे महत्त्वाचे आहे.

सत्ता किंवा अधिक सत्ता असलेली व्यक्ती आपल्यापेक्षा कमकुवत (शारीरिक,मानसिक,आर्थिक, सामाजिक दृष्ट्या) व्यक्तीवर नियंत्रण ठेवण्यासाठी हिंसेचा सहज वापर करते. स्वतःची सत्ता ही जणू काही निसर्गदत्तच आहे अशा मनोभूमीकेतून,विचारातून हिंसा होते. त्यामुळेच हिंसा ही एक घटना नसून पुरुषप्रधान प्रजासत्ताक व्यवस्थेतून, मानसिकतेतून ती निर्माण होते.ह्या व्यवस्थेमध्ये शतकानुशतके चालत आलेल्या स्त्री-पुरुषांच्या साचेबंद प्रतिमांमधून 'आदर्श स्त्री' कोण', 'आदर्श पुरुष' कोण हे ठरवले जाते. ह्या प्रतिमा स्त्री-पुरुष नात्यांमध्ये उतरंड तयार करतात,स्त्रियांना दुय्यम लेखतात. त्यातून स्त्रीच्या वागण्या बोलण्यावर, विचारावर नियंत्रण ठेवले जाते.

हिंसा करताना स्वतःचे वर्तन गैर आहे ह्याची जाणीवही, विचारही मनामध्ये न आणून देण्याची क्षमता ह्या व्यवस्थेमध्ये दिसते.हींसा ही व्यक्तीचा शांततेने जगण्याचा मूलभूत हक्क हिरावून घेते, ती नात्यामध्ये भेदभाव निर्माण करते, मानवी हक्कांची पायमल्ली करते आणि म्हणूनच कोणीही कोणावरही केलेल्या हिंसेचे कधीच समर्थन होऊ शकत नाही न्यायालयामध्ये कौटुंबिक हिंसेच्या संदर्भात केसेस हाताळतांनी मनात ठेवून, लिंग भावाधिष्ठित दृष्टिकोनातून, सहानुभूतीच्या भूमिकेतून, संवेदनशीलतेने बघितल्यास, सदर कायद्याची अंमलबजावणी निश्चितच परिणामकारक, न्याय पद्धतीने होईल असा विश्वास वाटतो. सदर कायद्याच्या उद्दिष्टांमध्ये कौटुंबिक हिंसा ही मानवी हक्कांच्या उल्लंघनाच्या वादातील मुद्दा आहे. विकासाला खेळ घालणारा आहे. ती मोठ्या प्रमाणात होते आहे.

भारतीय दंड विधान संहितेतील कलम 498A जरी कौटुंबिक हिंसा गुन्हा ठरत असेल तरी सर्व समावेशक पद्धतीने कौटुंबिक हिंसेच्या विरोधात दिवाणी कायद्यात तरतूद नाही, आणि म्हणूनच भारतीय राज्यघटनेतील कलम 14,15,21 विचारात घेऊन स्त्रियांचे कौटुंबिक हिंसेपासून संरक्षण करण्यासाठी त्यास प्रतिबंध घालण्यासाठी कौटुंबिक हिंसेपासून स्त्रियांच्या संरक्षणाचा अधिनियम हा कायदा तयार करण्यात आला आहे. कायद्याच्या ह्या उद्दिष्टांमध्ये आपल्या राज्यघटनेचा तसेच सिडॉ ह्या मानवी हक्कांच्या कराराच्या आधाराने झालेली आहे. ही बाब लक्षात ठेवूनच कायद्याची अंमलबजावणी करण्याची अत्यंत महत्त्वाची जबाबदारी न्यायालयीन यंत्रणेवर आहे.

स्त्रियांच्या हक्कांशी,मूलभूत हक्कांशी,कौटुंबिक हिंसेचा संबंध: आंतरराष्ट्रीय करारानुसार कौटुंबिक हिंसा ही स्त्रीच्या मानवी हक्कांच्या विरोधात काम करते आणि म्हणून हा कायदा वाचताना त्याचा लावताना, न्याय करताना,निर्णय देताना ही बाब सतत लक्षात ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. कोणत्याही स्वरूपातील छोटी- मोठी,साधी, गंभीर हिंसाही कायद्याविरोधातीलच आहे. तिचे कोणत्याही प्रकारे प्रचलित असणाऱ्या समजुती- गैरसमजुती आधारे समाजमान्य असणाऱ्या हिंसककृतींचे समर्थन होऊ शकत नाही याची खूनघाट बांधणे आवश्यक आहे.

कौटुंबिक हिंसेची व्यापक व्याख्या: सदर कायदा हा भारतातील पहिलाच कायदा आहे.'कौटुंबिक हिंसेची' अतिशय व्यापक व्याख्या केली आहे. मानवी हक्कांसंदर्भातील आंतरराष्ट्रीय करारांची अंमलबजावणी करण्यासाठी नियुक्त केलेल्या समितीने जी व्याख्या केली आहे, त्या व्याख्येचा आधार घेऊन ही व्याख्या केली आहे,शारीरिक,शाब्दिक, भावनिक,आर्थिक,लैंगिक अशा सर्व प्रकारच्या हिंसेचा समावेश या व्याख्येत केला आहे.

कोणत्याही हिंसा पीडित व्यक्तीला सदर कायद्याखाली केव्हा कोणाविरुद्ध दाद मागता येईल हे स्पष्ट करण्यासाठी काही इतर महत्त्वाच्या व्याख्याही करण्यात आल्या आहेत.उदा: कौटुंबिक नातेसंबंध,सामायिक घर,अर्जदार पिडिता,प्रतिवादी,कौटुंबिक घटनेचा अहवाल डी आय आर इ. पीडित महिलेचे विशेष अधिकार: सदर कायदा हिंसा पीडित महिलेचतीन महत्त्वाचे अधिकार ओळखतो; ते म्हणजे- हिंसामुक्त जीवन जगण्याचा अधिकार कलम 3, सामायिक घरात राहण्याचा अधिकार कलम-17,आणि समस्येचे समाधान मिळवण्याचा अधिकार कलम-12.

कौटुंबिक हिंसेपासून संरक्षण होण्यासाठी वेगवेगळे न्यायालयीन आदेश: कलम 12,18,19,20,21, 22,23: सदर कायद्यामधील अनेक महत्त्वाच्या वैशिष्ट्यांपैकी ही एक अतिशय

ठळक तरतूद आहे. हिंसा पिडितेला सर्वार्थाने,सर्व समावेशक न्याय मिळवण्याच्या दृष्टीने, तिच्यासमोर उभ्या ठाकलेल्या परिस्थितीला समर्थपणे तोंड देता यावे म्हणून सर्व प्रकारच्या आदेशांची तरतूद केली आहे, योग्य ते आदेश देण्याची अत्यंत महत्त्वाची जबाबदारी न्यायदंडाधिकाऱ्यांवर आहे, घरात राहण्याचा आदेश, मुलांच्या ताब्याचा आदेश, पैशाच्या संदर्भातील आदेश, नुकसान भरपाईचा आदेश ह्यांची तरतूद केलेली आहे. हे सर्व आदेश एकतर्फी अंतरीम किंवा अंतरिम मिळण्याचीही तरतूद कलम 23 मध्ये केलेली आहे.

कौटुंबिक नातेसंबंध म्हणजे:कलम2(f) प्रमाणे 'कौटुंबिक नातेसंबंध' म्हणजे जेव्हा दोन व्यक्ती एकत्रित घरात राहतात किंवा एकेकाळी राहत असताना त्या दोन व्यक्तींमध्ये रक्ताच्या नात्याने,विवाहाने किंवा विवाह सदृश्य नातेसंबंधामुळे किंवा दत्तक विधानामुळे नातेसंबंध आहेत किंवा एकत्र कुटुंबातील सदस्य म्हणून ते एकत्र राहत आहे.

विवाह सदृश्य नाते संबंध:विवाह सदृश्य नातेसंबंध म्हणजे सर्वसाधारण कायद्याप्रमाणे विवाह.( सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार) विवाह सदृश्य नातेसंबंध ओळखण्यासाठी न्यायालयीन निर्णयांनी काही अटी दिल्या आहेत. त्यापैकी काही अटी पुढील प्रमाणे आहेत;(1)त्यांच्या आजूबाजूचा समाज त्यांना जोडीदार असल्याप्रमाणे नवरा-बायको म्हणून ओळखतो.(2) बराच काळ ते स्वच्छेने पती-पत्नी सारख्या नात्याने एकत्र राहिलेले आहेत.(3) त्या विवाह योग्य वयाच्या प्रौढ व्यक्ती आहेत.(4) ते कायदेशीर विवाह करण्यास योग्य आहेत.

स्त्रियांच्या आर्थिक समस्या: वेगाने बदलणाऱ्या आधुनिक युगात महिला सशक्तिकरण किंवा महिला सक्षमीकरण हा महत्त्वाचा मुद्दा आहे. एखादा व्यक्ती सक्षम असणे याचा अर्थ आहे की,तो स्वतःघेऊ शकतो, आणि कोणाच्याही सहाय्याशिवाय जीवन जगू शकतो. आजच्या काळात महिला सक्षमीकरण हा चर्चेचा विषय बनला आहे. कारण आज प्रत्येकाला कळून चुकले आहे की, देशातील स्त्रियांच्या प्रगती शिवाय देशाची प्रगती शक्य नाही. अशा पद्धतीने स्त्रियांना मान देण्यात आला आहे. स्त्री मानव जातीचे अस्तित्व आहे.की, देशातील स्त्रियांच्या प्रगती शिवाय देशाची प्रगती शक्य नाही. अशा पद्धतीने स्त्रियांना मान देण्यात आला आहे. श्री मानव जातीचे अस्तित्व आहे. तिच्यामुळेच सृष्टी निर्माण झाली आहे. म्हणून स्त्रीला पुरुषाप्रमाणेच अधिकार दिले पाहिजे.इत्यादी गोष्टीची पूर्तता केल्यास एक स्त्री सक्षम आणि सशक्त होईल. आपले निर्णय स्वतः घेण्यास ती पूर्णपणे तयार झालेली असेल. आज भारत शासनाद्वारे महिलांच्या सशक्तिकरणासाठी अनेक योजना राबविल्या जात आहेत. महिला व बालविकास कल्याण मंत्रालय भारत सरकारद्वारे महिलांना सशक्तीकरणाकडे विशेष लक्ष दिले जात आहे. सुकन्या समृद्धी योजना, प्रधानमंत्री जनधन योजना, उज्वला योजना इत्यादी काही प्रमुख महिला सशक्तिकरण योजना भारत सरकारद्वारे राबविण्यात येत आहे.

आज भारताची जलद होणारी आर्थिक प्रगती पाहता असे लक्षात येते की, येत्या काही वर्षांमध्ये भारत महिला सक्षमीकरणाचे ध्येय साध्य करू शकेल परंतु लवकरात लवकर संपूर्ण देशातील महिलांना सशक्त करण्याकरिता योग्य निर्णय आणि उपक्रम राबविणे आवश्यक आहे. शासनाने व देशातील जनतेने महिला ससक्षमीकरणाची आवश्यकता समजून घ्यायला हवी.व या विषयी जास्तीत जास्त लोकांना ते जागृती निर्माण करायला हवी.जर या सर्व गोष्टी पार पडल्या तर येत्या काही वर्षातच भारतातील महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून कार्य करताना दिसतील.

भारतात शासनाद्वारे महिलांच्या सक्षमीकरणासाठी व सबलीकरणासाठी अनेक योजना राबविल्या जात आहेत.महिला व बाल विकास कल्याण मंत्रालय भारत सरकारद्वारे महिला सक्षमीकरणाकडे विशेष लक्ष दिले जात आहे. सुकन्या समृद्धी योजना,पी.एम.जनधन योजना अशा काही निवडक योजना भारत सरकार द्वारे राबविण्यात येत आहे.महिला सक्षमीकरणासाठी असलेल्या धोरणांचा व विविध योजनांचा लाभ महिलांना मिळाला तर त्या खऱ्या अर्थाने सक्षम होतील. अर्थात सर्व क्षेत्रात महिलांना समान संधी व समान स्थान मिळविण्याकरिता महिलांसाठी केलेल्या सर्व कायदेशीर तरतुदींची आणि कार्यक्रमाची अंमलबजावणी काटेकोरपणे करणे गरजेचे आहे. तेव्हाच महिलांना समाजाचा एक परिपूर्ण घटक म्हणून समान स्थान मिळेल.आणि खऱ्या अर्थाने महिला सक्षमीकरण होण्यास मदत होईल. महिला सक्षमीकरणामुळे महिलांच्या जीवनात अनेक बदल झाले आहेत. महिलांनी प्रत्येक कामात सक्रिय भाग घेणे सुरू केले आहे. महिला स्वतःचे निर्णय स्वतः घेऊ लागले आहेत. महिला हळूहळू स्वावलंबी होऊ लागल्या आहेत. पुरुषही आता स्त्रियांना समजून घेत आहेत. त्यांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी आता महिलांच्या निर्णयाचा आदर करत आहेत.आजही ग्रामीण भागातील महिलांचे जीवन अनेक समस्येने ग्रस्त आहे.जसे मुलींच्या जन्माचे स्वागत नाही.मुलगा हाच वंशाचा दिवा,शिक्षणाचा अभाव, महिलांवर चारित्र संशय इत्यादी प्रश्नांना आजही भारतीय समाजातील महिलांना सामोरे जावे लागते आहे.

कुटुंबास स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारासंबंधातील घटनांची तातडीने नोंद घेतली जात नाही.ज्या स्त्रीवर अत्याचार झाला आहे,त्या स्त्रीस न्याय मिळवून देण्यासाठी कुटुंबातून म्हणावा तसा सकारात्मक प्रतिसाद व पाठिंबा मिळत नाही. स्त्रियांवर झालेल्या अत्याचाराचे मोजमाप कायद्याच्या चौकटीत होत नाही बऱ्याच वेळा पोलीस ठाण्यात पीडित महिलेवर विश्वास ठेवून तक्रार दाखल करून न घेता तडजोड करून सासरी नांदायला पाठविले जाते. यामुळे अन्याय करणाऱ्या व्यक्तीला बळ मिळते व यातून कौटुंबिक हिंसाचारासारख्या असामाजिक घटनांकडे दुर्लक्ष होताना दिसते. अशा विविध कारणांमुळे स्त्रियांना अन्यायाला सामोरे जावे लागते व कौटुंबिक हिंसाचारात वाढ होताना दिसते.

## संदर्भ

1. स्त्री प्रश्नाची चर्चा- रानडे प्रतिभा,पॉपूलर प्रकाशन मुंबई,(1991)
2. भारतातील सामाजिक समस्या-पी.के.कुलकर्णी विद्या प्रकाशन,नागपूर (1998)
3. भालेराव हेमा,महिलांचे वैवाहिक हक्क,महिला कल्याण केंद्र,पुणे,2007
4. एस.यादव "महिला सक्षमीकरण आणि माध्यमे"
5.एम.भाटिया "घरगुती हिंसा आणि कायदेशीर फ्रेमवर्क".